दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६ | वर्ष - १ | अंक - ३०५ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

दिनांक : २ ऑगस्ट २०२६ वार : रविवार माह (अमावस्यांत) : आषाढ माह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : चतुर्थी तिथी (रात्री ११:१५ पर्यंत) त्यानंतर पंचमी तिथी नक्षत्र : पूर्वाभाद्रपदा नक्षत्र (रात्री ०९:३६ पर्यंत) त्यानंतर उत्तराभाद्रपदा नक्षत्र योग : अतिगण्ड योग (रात्री १०:२९ पर्यंत) त्यानंतर सुकर्मा या करण : भाव करण (सकाळी ११:१४ पर्यंत)

### 'सुखकर रजोनिवृत्ती' व 'महिलांची सुरक्षा' विषयावर कार्यशाळा संपन्न

**पुणे :** महिलांचे आरोग्य आणि कार्यस्थळावरील सुरक्षा हाच सशक्त समाजाचा पाया असे प्रतिपादन कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी केले. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी महिला तक्रार निवारण समिती आणि आयुष विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सुखकर रजोनिवृत्ती महिलांच्या निरोगी, आनंदी व सशक्त आयुष्यासाठी तसेच कामाच्या ठिकाणी महिलांची सुरक्षाः महिलांची सुरक्षा कायदा या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन विद्यापीठात करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व धनवंतरी पुजन करुन करण्यात आले.

# न्यायाधीशांची निवड गुप्त का? सर्वोच्च न्यायालयाच्या कोलेजियमवर न्यायमूर्ती उज्जल भुयान यांचाच थेट सवाल!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी**

देशाच्या न्यायव्यवस्थेच्या पारदर्शकतेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती **Ujjal Bhuyan** यांनी कोलेजियम प्रणालीवर थेट टीका करत, न्यायाधीशांच्या नियुक्ती किंवा बढतीसाठी कारणे जाहीर न करणे ही न्यायपालिकेचीच हानी असल्याचे स्पष्टपणे म्हटले आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे न्यायव्यवस्थेतील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि जनतेच्या माहितीच्या अधिकारावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

**Supreme Court Collegium** प्रणालीवर बोलताना न्यायमूर्ती भुयान म्हणाले की, कारणे न देण्यामुळे उत्कृष्ट काम करणाऱ्या न्यायाधीशांवर अन्याय होतो, तर दुसरीकडे वादग्रस्त व्यक्तींना न्यायव्यवस्थेत प्रवेश मिळण्याचा धोका वाढतो. त्यांच्या मते, नियुक्ती प्रक्रियेत सार्वजनिक चर्चेला आणि कारणांच्या प्रकटीकरणाला घाबरण्याचे कोणतेही कारण नाही. उलट त्यामुळे न्यायपालिकेवरील लोकांचा विश्वास अधिक मजबूत होईल.



त्यांनी अलीकडील कोलेजियम ठरावांकडेही लक्ष वेधले. त्यांच्या म्हणण्यानुसार, २०२५ पासूनच्या अलीकडील तीन कोलेजियम ठरावांमध्ये न्यायाधीशांच्या शिफारशीमागील कोणतीही कारणे नमूद करण्यात आलेली नाहीत. यापूर्वी प्रत्येक शिफारशीसोबत काही ना काही कारण दिले जात असे. ती कारणे कधीकधी औपचारिक किंवा एकाच साच्यातील असली तरी, किमान निर्णयामागील भूमिका स्पष्ट होत होती. आता तीही परंपरा थांबल्याने पारदर्शकतेत मागे जाण्याचा धोका निर्माण झाला आहे.

न्यायमूर्ती भुयान यांनी हेही स्पष्ट केले की, भारतीय नागरिकांना न्यायालयात काय घडते, न्यायाधीश कोण आहेत आणि त्यांनी कोणते निर्णय दिले आहेत, हे जाणून घेण्याचा घटनात्मक अधिकार आहे. न्यायव्यवस्था स्वतःच्या निर्णयांमध्ये पारदर्शकतेचा आग्रह धरत असताना, न्यायाधीशांच्या नियुक्ती प्रक्रियेत मात्र गुप्तता का ठेवली जाते, असा अप्रत्यक्ष सवाल त्यांनी उपस्थित केला.

या चर्चेत सहभागी असलेले वरिष्ठ वकील **Saurabh Kirpal** यांनीही कारणे जाहीर केल्याने मनमानी निर्णयांना आळा बसतो, असे मत व्यक्त केले. त्यांनी अमेरिकेतील सर्वोच्च न्यायालयातील नियुक्ती प्रक्रियेचे उदाहरण देत सांगितले की, तेथील न्यायाधीशांना सार्वजनिक आणि संसदीय छाननीला सामोरे जावे लागते; त्यामुळे त्यांच्या विचारसरणीवर मतभेद असले तरी पारदर्शकतेबाबत प्रश्न राहत नाही.

न्यायमूर्ती भुयान यांच्या वक्तव्यामुळे आता मोठा प्रश्न समोर उभा राहतो जर न्यायव्यवस्था स्वतःच पारदर्शकतेची बाजू घेत असेल, तर न्यायाधीशांची निवड करणाऱ्या कोलेजियम प्रणालीत पारदर्शकतेचे निकष लागू का होत नाहीत? न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास टिकवायचा असेल, तर केवळ न्यायालयीन निर्णयच नव्हे, तर न्यायाधीशांच्या नियुक्तीची प्रक्रियाही अधिक खुली, उत्तरदायी आणि पारदर्शक करणे आवश्यक असल्याची मागणी या वक्तव्यानंतर अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

## सारांश वृत्त

### कागदोपत्री पाऊस, प्रत्यक्षात दुष्काळी झळा; इंदापूरमध्ये खरीप पेरणी फक्त ६५ टक्के

■ दैनिक राज्य लोकतंत्र

इंदापूर (पुणे) । प्रतिनिधी

पेरणीचा मुख्य हंगाम असलेल्या जून आणि जुलै महिन्यात पावसाने दिलेल्या सततच्या हुलकावणीमुळे इंदापूर तालुक्यातील बळीराजा मोठ्या संकटात सापडला आहे. दोन महिन्यांत तब्बल २६ दिवस पावसाचा खंड पडल्याने खरीप पिकांच्या वाढीवर विपरीत परिणाम झाला असून, तालुक्यातील खरीप पेरणी केवळ ६५ टक्क्यांवरच थांबली आहे. उर्वरित ३५ टक्के क्षेत्र अद्याप पेरणीविना असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

जून महिन्यात तालुक्यात १०४.७ मिमी पावसाची नोंद झाली. मात्र, हा पाऊस काही मोजक्याच दिवसांत पडला. महिन्यात तब्बल १६ दिवस पाऊसच झाला नाही. विशेष म्हणजे १० ते २२ जूनदरम्यान सलग १३ दिवस पावसाने दडी मारल्याने उगवलेली पिके करपू लागली. जूनमध्ये ९ जून रोजी सर्वाधिक २७.३ मिमी पाऊस झाला.

जुलै महिन्यातही परिस्थितीत फारसा बदल झाला नाही. ३१ जुलैअखेर ८४.५ मिमी पावसाची नोंद झाली असली, तरी महिन्यात केवळ आठ दिवसच समाधानकारक पाऊस झाला. १० ते १६ जुलैदरम्यान सलग सात दिवस पावसाचा खंड पडला, तर एकूण १० दिवस पूर्णपणे कोरडे गेले. महिन्यातील सर्वाधिक २४.७ मिमी पाऊस ३१ जुलै रोजी नोंदविण्यात आला. कृषी विभागाच्या माहितीनुसार, तालुक्यात मक्याची पेरणी सर्वाधिक ८,३२६.६० हेक्टर क्षेत्रावर झाली आहे. त्यानंतर बाजरी, तूर, उडीद, सोयाबीन, मूग, कापूस, सूर्यफूल व भुईमूग या पिकांची लागवड झाली असली, तरी पावसातील अनियमिततेचा सर्वाधिक फटका मका, मूग, उडीद आणि तूर पिकांना बसला आहे. अनेक ठिकाणी कोवळी पिके सुकू लागली असून, दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले आहे.

पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पावसाचा ताण आल्याने यंदा उत्पादनात ३० ते ४० टक्क्यांपर्यंत घट होण्याची शक्यता कृषी क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केली आहे. ऑगस्ट महिन्यात नियमित पाऊस झाला नाही, तर उर्वरित ३५ टक्के क्षेत्र रब्बी हंगामापर्यंत पडीक राहण्याची भीती आहे.

## नीटचा पेपर तीन शिक्षकांनीच फोडला पण खरी चूक कोणाची? शिक्षणव्यवस्थेवर सरकारचे नियंत्रण की निष्काळजीपणा?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

देशातील सर्वात प्रतिष्ठेची आणि लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा निर्णय घेणारी छएएढ-णत्र २०२६ परीक्षा पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. धक्कादायक बाब म्हणजे प्रश्नपत्रिका तयार करण्याची आणि तिचे मराठी भाषांतर करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर होती, त्याच तीन शिक्षकांनी कथितरित्या पेपरफुटीत भूमिका बजावल्याचा आरोप सीबीआयने आपल्या आरोपपत्रात केला आहे. पण या प्रकरणामुळे केवळ काही आरोपींची नावे समोर आली नाहीत, तर सरकारच्या परीक्षा व्यवस्थेची विश्वासार्हताच गंभीर प्रश्नचिन्हाखाली आली आहे.

सीबीआयनुसार, राष्ट्रीय परीक्षा संस्थेने (NTA) प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या शिक्षकांनाच तिच्या भाषांतराची जबाबदारी दिली. परिणामी अंतिम प्रश्नपत्रिका लक्षात ठेवण्याची आणि ती बाहेर पोहोचवण्याची संधी निर्माण झाली. इतकेच नव्हे, तर गोपनीयतेच्या नावाखाली सुरक्षित ठेवलेल्या या शिक्षकांना घरी जाण्याची आणि खासगी कोचिंग क्लासमध्ये शिकवण्याची परवानगी देण्यात आली होती. जर ही बाब आरोपपत्रानुसार खरी असेल, तर ही केवळ वैयक्तिक गैरप्रकाराची घटना नसून संपूर्ण परीक्षा व्यवस्थेतील संस्थात्मक अपयश ठरते.

सर्वात गंभीर प्रश्न सरकारला आणि एनटीएला विचारला जात आहे देशातील कोट्यवधी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित परीक्षेत इतक्या प्राथमिक सुरक्षात्मक त्रुटी कशा राहिल्या? पेपरसेटर, भाषांतरकार आणि कोचिंगशी संबंधित व्यक्तींमध्ये हितसंबंधांचा संभाव्य संघर्ष रोखण्यासाठी कोणती व्यवस्था होती? जर नव्हती, तर त्याची जबाबदारी कोण स्वीकारणार?

नीट पेपरफुटीचे हे प्रकरण केवळ गुन्हेगारी कटाचा तपास नाही; ते भारतातील स्पर्धा परीक्षांच्या पारदर्शकतेवर आणि सरकारच्या प्रशासकीय क्षमतेवर कठोर प्रश्न उपस्थित करणारे प्रकरण आहे. लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांचा विश्वास डळमळीत झाल्यानंतर केवळ आरोपींना अटक करून हा विषय संपणार नाही. उत्तरदायित्व, प्रणालीतील सुधारणा आणि दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई याशिवाय शिक्षण व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास पुन्हा मिळवणे सरकारसमोरचे सर्वात मोठे आव्हान ठरणार आहे.

## '८०% कामे पूर्ण' आरोग्य प्रकल्पांना गती; स्वातंत्र्यदिनी विक्रमी लोकार्पणाचा शासनाचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । विशेष प्रतिनिधी**

राज्यातील ८० टक्क्यांहून अधिक बांधकामे पूर्ण झालेल्या आरोग्य संस्थांना प्राधान्याने कार्यान्वित करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, स्वातंत्र्यदिनानिमित्त मोठ्या संख्येने रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ट्रॉमा केअर युनिट्स आणि उपकेंद्रांचे लोकार्पण होणार असल्याचा दावा करण्यात आला आहे.




आरोग्य विभागाच्या म्हणण्यानुसार, बांधकाम पूर्ण होताच आवश्यक वैद्यकीय उपकरणे, फर्निचर आणि मनुष्यबळाची उपलब्धता सुनिश्चित करण्यात आली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांतील ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे नागरिकांच्या सेवेत दाखल होणार आहेत.

मात्र, या आरोग्य संस्था प्रत्यक्षात पूर्ण क्षमतेने कधी कार्यरत होणार, डॉक्टर व तज्ज्ञांची रिक्त पदे कधी भरली जाणार आणि उद्घाटनानंतर सेवा अखंडपणे सुरू राहणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. केवळ इमारतींचे लोकार्पण नव्हे, तर दर्जेदार आरोग्य सेवा प्रत्यक्षात मिळणे हीच खरी कसोटी ठरणार आहे.

## काँग्रेसकडून सुनिल तटकरेंना मोठा धक्का, भाचे कॅप्टन अमोल महाडिक यांचा सहकाऱ्यांसह काँग्रेसमध्ये प्रवेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । विशेष वृत्त**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांचे भाचे कॅप्टन अमोल महाडिक यांनी आज काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत आपल्या सहकाऱ्यांसह टिळक भवन येथील कार्यक्रमात काँग्रेस पक्षात प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी त्यांचे काँग्रेस परिवारात स्वागत करून शुभेच्छा दिल्या. यावेळी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव आणि तेलंगणाचे सहप्रभारी सचिन सावंत, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे आदी उपस्थित होते.

देशात लोकशाही व संवैधानिक मुल्ये पायदळी तुडवत भाजपा सरकारचा मनमानी कारभार सुरु असून, ते देशासाठी अत्यंत घातक आहे, म्हणून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोठा लढा पुकारला आहे. हुकूमशाही प्रवृत्तींच्या हातून देश वाचवणे हे सर्वात महत्वाचे आहे. राहुल गांधी यांनी सुरु केलेल्या लढाईला देशभरातून पाठिंबा मिळत आहे. तरुण वर्गाचाही मोठा पाठिंबा मिळत आहे. राहुल गांधी यांच्या लढ्यात सहभागी होत त्यांचे हात बळकट करण्यासाठी अनेकजण काँग्रेस पक्षात प्रवेश घेत आहेत. कॅप्टन अमोल महाडिक यांनीही तोच मार्ग निवडला असून देशाला खऱ्या अर्थाने काँग्रेसचा विचार व राहुल गांधी यांचे नेतृत्वच



तारू शकते हा विश्वास दृढ होत आहे. अमोल महाडिक यांना प्रोफेशनल काँग्रेस विभागात काम करण्याची संधी देण्यात येत आहे. त्यांच्या अनुभवाचा पक्षालाही फायदाच होईल, असे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. आमचे कुटुंब काँग्रेस विचाराचेच असून आजोबा दत्ताजीराव उर्फ आण्णासाहेब तटकरे हे काँग्रेस पक्षाचे नेते होते. आज काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने घरी आल्यासारखे वाटत आहे. राहुल गांधी यांचे नेतृत्वच देशाला तारू शकणार आहे म्हणून काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे, पक्ष जी जबाबदारी देईल ती समर्थपणे पार पाडेन, असे अमोल महाडिक यावेळी म्हणाले.

पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, अन्न व औषध विभागाने राज्यात स्वच्छता मोहिम हाती घेत कडक कारवाई सुरु केली आहे. जेथे जेथे अस्वच्छता, घाण पसरली आहे ती साफ झालीच पाहिजे. ज्या हॉटेल वा कॅन्टिनमध्ये अस्वच्छता दिसते व घाणीचे साम्राज्य दिसते त्याचा परवाना रद्ध केला जात आहे, तसेच या सरकारवरही कारवाई झाली पाहिजे. हे सरकारच घाणीतून आले असून सगळीकडे घाण पसरवत आहे म्हणून या सरकारचाच परवाना रद्ध केला पाहिजे, असे सपकाळ म्हणाले. मनोज जरांगे यांच्या उपोषणावर बोलताना सपकाळ म्हणाले की, भाजपा महायुती सरकाने मनोज जरांगे यांना दोनवेळा आश्वासन दिल्याने त्यांनी आंदोलन मागे घेतले तरीही त्यांना पुन्हा आंदोलन करावे लागत आहे.

सरकारने जरांगे यांना याआधी कोणती आश्वासने दिली होती ती जाहीर करावीत. मुळात हे सरकारच खोटारडे आहे, मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत धनगर समाजाच्या आरक्षणाच्या फाईलवर सही करणार पासून सुरु झालेला हा प्रवास फसवा आहे. आरक्षणाच्या नावावर जाती-जातीत भांडणे लावणे हाच धंदा भाजपा महायुती सरकारचा आहे. सरकारला जर आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावायचा असेल तर जातनिहाय जनगणना करावी, ही काँग्रेस पक्षाची मागणी मान्य करावी, असेही सपकाळ म्हणाले.

## 'शंभर वर्षांचा क्लब सरकारच्या रडारवर; टॉकटोरा रोडवरील 'सोन्याची' जमीनच खरी कारणीभूत?'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी**

शतकभराचा इतिहास असलेल्या सेंट्रल सेक्रेटेरिएट क्लब (उडउ) ची केंद्र सरकारने मान्यता रद्द करून बेदखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. सरकारने आर्थिक अनियमितता, निवडणुका न होणे आणि अनधिकृत व्यावसायिक वापर ही कारणे पुढे केली असली, तरी या कारवाईमागे राजधानीतील अत्यंत मोलाच्या सरकारी जमिनीचा पुनर्वापर हा महत्त्वाचा मुद्दा असल्याची चर्चा प्रशासन आणि राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

दिल्लीतील टॉकटोरा रोड परिसर हा देशातील सर्वाधिक महत्त्वाच्या प्रशासकीय भागांपैकी एक मानला जातो. संसद, राष्ट्रपती भवन, नॉर्थ आणि साऊथ ब्लॉक तसेच नव्या सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पाच्या जवळ असलेला हा परिसर धोरणात्मक आणि व्यावसायिकदृष्ट्या अत्यंत मौल्यवान आहे. त्यामुळे या जागेवर सरकारची नजर असणे स्वाभाविक मानले जात आहे.

सरकारचे म्हणणे आहे की, तीन सदस्यीय मूल्यमापन समितीच्या अहवालानुसार क्लबमध्ये अनेक वर्षे नियमित निवडणुका झाल्या नाहीत, आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकतेचा अभाव होता आणि सरकारी जमिनीचा काही भाग अनधिकृत व्यावसायिक उपक्रमांसाठी वापरला जात होता. या निष्कर्षांच्या आधारे कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने (¦oPT) क्लबची मान्यता कायमस्वरूपी रद्द केली आणि त्यानंतर इस्टेट संचालनालयाने जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू केली.

मात्र, क्लबने हा निर्णय दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान देत सरकारवर नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. क्लबचा दावा आहे की, त्यांचे म्हणणे प्रभावीपणे न ऐकता कारवाई करण्यात आली असून, बेदखल करण्यामागे केवळ प्रशासकीय कारणे नसून त्या जागेचा इतर शासकीय वापर करण्याचा उद्देश असू शकतो.

राजधानीतील जमिनीचे वाढते महत्त्व पाहता सरकार मोठ्या प्रमाणावर शासकीय मालमत्तांचे पुनर्विकास, पुनर्वापर आणि एकत्रीकरण करत आहे. सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पानंतर अनेक जुन्या सरकारी इमारती आणि संस्थांच्या जागांचा नव्याने वापर करण्याचे नियोजन सुरू आहे. अशा परिस्थितीत उडउ च्या जागेचाही भविष्यातील शासकीय आराखड्यात समावेश असू शकतो, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, सरकारने या जागेचा पुढील वापर नेमका कशासाठी होणार आहे, याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही.

यामुळे या प्रकरणात दोन वेगवेगळे मुद्दे समोर येत आहेत. एकीकडे सरकारचा दावा आहे की ही कारवाई नियमभंग आणि गैरव्यवस्थापनाविरोधातील प्रशासकीय पाऊल आहे; तर दुसरीकडे टीकाकारांचा प्रश्न आहे की, जर अनियमितताच एकमेव कारण असेल, तर सुधारणा, पुनर्रचना किंवा नवीन व्यवस्थापन नेमण्याचा पर्याय का स्वीकारला गेला नाही? थेट मान्यता रद्द करून बेदखल करण्याचा निर्णयच का घेण्यात

## संपादकीय

### पंच कोणाचा? सरकारचा की संविधानाचा?

भारताची लोकशाही आज एका मूलभूत प्रश्नासमोर उभी आहे निवडणूक आयोग हा सरकारचा विस्तार आहे की संविधानाने निर्माण केलेली स्वतंत्र संस्था? हा प्रश्न विरोधकांनी उपस्थित केलेला नाही; तो थेट सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला विचारला आहे. त्यामुळे या प्रश्नाचे गांभीर्य अधिक वाढते.

क्रिकेटमध्ये पंच निष्पक्ष नसल्याचा संशय आला, तर सामन्याचा निकाल कितीही योग्य असला तरी तो स्वीकारला जात नाही. लोकशाहीत निवडणूक आयोग हा त्या पंचाच्या भूमिकेत असतो. त्यामुळे आयोग फक्त निष्पक्ष असणे पुरेसे नाही; तो कोणाच्याही प्रभावाखाली नाही, असा निर्विवाद विश्वास नागरिकांच्या मनात असणे अधिक महत्त्वाचे आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी केंद्र सरकारने २०२३ मध्ये केलेल्या कायद्यामुळे आज हा विश्वासच कसोटीवर लागला आहे. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी नियुक्ती प्रक्रियेत पंतप्रधान, विरोधी पक्षनेते आणि सरन्यायाधीश यांचा समतोल राखणारी समिती सुचवली होती. मात्र संसदेने मंजूर केलेल्या नव्या कायद्यात सरन्यायाधीशांना वगळून केंद्रीय मंत्र्याचा समावेश करण्यात आला. परिणामी समितीत सरकारचे दोन प्रतिनिधी आणि विरोधकांचा एक प्रतिनिधी अशी रचना झाली.

मग प्रश्न उभा राहतो नियुक्ती करणाऱ्या समितीत सरकारचे बहुमत असेल, तर आयोगाच्या स्वायत्ततेबद्दल नागरिकांच्या मनात शंका निर्माण होणार नाही का? सर्वोच्च न्यायालयानेही सुनावणीदरम्यान हाच प्रश्न उपस्थित केला आहे.

सरकारचा युक्तिवादही महत्त्वाचा आहे. संसदेला कायदा करण्याचा घटनात्मक अधिकार आहे आणि नियुक्ती प्रक्रिया कशी असावी, हा धोरणात्मक निर्णय असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. परंतु लोकशाहीत केवळ अधिकार पुरेसा नसतो; त्या अधिकाराचा वापर जनतेच्या विश्वासाला धक्का न लावणारा असावा लागतो.

आजचा वाद केवळ एका कायद्याचा नाही. तो भारतातील प्रत्येक मतदाराच्या विश्वासाचा आहे. मतदान करताना नागरिकाला एवढीच अपेक्षा असते की, त्याचे मत कोणत्याही राजकीय दबावाशिवाय मोजले जाईल आणि निवडणूक आयोग सर्व पक्षांशी समान वागणूक ठेवेल. आयोगाच्या नियुक्ती प्रक्रियेवरच संशय निर्माण झाला, तर भविष्यात निवडणुकीच्या निकालांवरही अनावश्यक प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते.

घटनात्मक संस्थांची ताकद त्यांच्या अधिकारात नसते; ती त्यांच्या विश्वासार्हतेत असते. न्यायालय, निवडणूक आयोग, नियंत्रक व महालेखापरीक्षक किंवा इतर स्वायत्त संस्था या कोणत्याही सरकारच्या नव्हे, तर संविधानाच्या असतात. सरकारे बदलतात, बहुमत बदलते, राजकीय समीकरणे बदलतात; पण संविधान आणि त्याच्या संस्थांवरील जनतेचा विश्वास अबाधित राहिला पाहिजे.

सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय काहीही असो, त्यातून एक गोष्ट स्पष्ट व्हायला हवी निवडणूक आयोगाची नियुक्ती अशी असली पाहिजे की कोणत्याही सरकारला, कोणत्याही पक्षाला किंवा कोणत्याही नागरिकाला त्याच्या निष्पक्षतेबद्दल संशय वाटू नये.

कारण लोकशाही केवळ मतदानावर टिकत नाही; ती विश्वासावर टिकते. आणि तो विश्वास ढासळला, तर निवडणुका राहतील, सरकारेही येतील-जातील; पण लोकशाहीचा आत्माच कमकुवत होईल.

लोकशाहीत पंच हा सरकारचा नसतो, विरोधकांचाही नसतो तो फक्त संविधानाचा असतो.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विचार प्रबोधन पर्व २०२६ ला उत्साहपूर्ण प्रारंभ

### उपमहापौर शर्मिला बाबर व आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते उद्घाटन; सांस्कृतिक कार्यक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित 'साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विचार प्रबोधन पर्व २०२६' या सातदिवसीय महोत्सवाचा शनिवारी भक्ती-शक्ती चौक, निगडी येथे उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ झाला. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या समता, सामाजिक न्याय, श्रमप्रतिष्ठा आणि परिवर्तनवादी विचारांचा वारसा समाजापर्यंत, विशेषतः युवा पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित या महोत्सवाचे उद्घाटन उपमहापौर शर्मिला बाबर आणि महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते झाले.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, प्रभाग अध्यक्षा अर्चना करांडे, नगरसदस्य अनिल घोलप, अनुराधा गोरखे, सुलभा उबाळे, सुप्रिया चांदगुडे, ऐश्वर्या तरस, निलेश तरस, मधुरा शिंदे, उपायुक्त अण्णा बोदडे, विशेष



अधिकारी किरण गायकवाड, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष गणेश अवघडे यांच्यासह विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्य क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापालिकेतर्फे १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवात सामाजिक प्रबोधनपर व्याख्याने, वैचारिक परिसंवाद, साहित्यिक कार्यक्रम, कवी संमेलन, लोककला सादरीकरणे, संगीत मैफिली तसेच विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी सनईवादन, पारंपरिक हलगीवादन, बँड सादरीकरण, 'स्वरचंदन' गीतगायन तसेच 'महाराष्ट्राची लोकसंस्कृती' या सांस्कृतिक कार्यक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या सात दिवसांच्या महोत्सवात विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ, साहित्यिक, विचारवंत, कलावंत आणि लोककलावंत सहभागी होणार असून सामाजिक प्रबोधनासोबतच महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा अनुभव घेण्याची संधी नागरिकांना उपलब्ध होणार आहे. महोत्सवातील सर्व कार्यक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने केले आहे.

# महापालिकेच्या नव्या मुख्यालयासमोर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याची मागणी

### सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांचे महापालिका प्रशासनाला निवेदन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या ऑटो क्लस्टरसमोरील नव्या अत्याधुनिक प्रशासकीय मुख्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर किंवा मध्यवर्ती आवारात छत्रपती शिवाजी महाराजांचा सिंहासनाधिष्ठित भव्य पुतळा उभारण्यात यावा, अशी मागणी प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे. यासंदर्भातील निवेदन त्यांनी प्रशासनाला सादर केले.

निवेदनात नमूद करण्यात आले



आहे की, शहराच्या नव्या प्रशासकीय मुख्यालयात प्रवेश करणाऱ्या नागरिकांना, लोकप्रतिनिधींना तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची, सुशासनाची आणि लोककल्याणकारी कार्यपद्धतीची प्रेरणा मिळावी, हा या मागणीमागील प्रमुख उद्देश आहे.

महापालिका प्रशासनाने आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी जनभावनेचा आदर करून या प्रस्तावाला प्रशासकीय स्तरावर तातडीने मंजुरी द्यावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

तसेच पुतळा उभारणीसाठी आवश्यक असलेल्या सर्व कायदेशीर, तांत्रिक आणि प्रशासकीय मंजुरी वेळेत पूर्ण करून नव्या मुख्यालयाच्या उद्घाटनासोबतच हा प्रकल्प पूर्णत्वास न्यावा, अशी अपेक्षाही मारुती भापकर यांनी व्यक्त केली आहे.

# मोशी दुर्घटनेची केंद्र सरकारच्या उच्चस्तरीय समितीकडून चौकशी करा; खासदार श्रीरंग बारणे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी ।**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी कचरा डेपो येथे झालेल्या भीषण दुर्घटनेची केंद्र सरकारच्या उच्चस्तरीय समितीकडून सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी पंतप्रधानांना निवेदन पाठवून दुर्घटनेतील जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात बारणे यांनी मोशी येथील 'वेस्ट-टू-एनर्जी' प्रकल्प उभारताना महापालिका प्रशासनाने चुकीची कागदपत्रे सादर करून पंतप्रधान



कार्यालयाची (पीएमओ) दिशाभूल केल्याचा संशय व्यक्त केला आहे. तसेच कचरा डेपोच्या बफर झोनमध्ये नियमांचे उल्लंघन करून प्रशासकीय इमारतीचे आरसीसी बांधकाम करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

या निष्काळजीपणामुळे कचऱ्याचा प्रचंड ढिगारा कोसळून नऊ कंत्राटी कामगारांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेस जबाबदार असलेल्या महापालिका अधिकारी आणि संबंधित ठेकेदारांविरुद्ध तात्काळ सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

दरम्यान, या प्रकरणाची राष्ट्रीय हरित लवादाने (एनजीटी) दखल घेतली असून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संयुक्त समितीला एका महिन्याच्या आत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

मोशी दुर्घटनेची निष्पक्ष आणि सर्वंकष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी मागणी खासदार श्रीरंग बारणे यांनी केली आहे.

# मुसळधार पावसामुळे शहरात झाडपडीच्या घटना; अग्निशमन विभागाची तात्काळ कार्यवाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

मागील दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील विविध भागांत झाडे उन्मळून पडण्याच्या घटना घडल्या. या घटनांची माहिती मिळताच पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाने तातडीने घटनास्थळी धाव घेत झाडे व तुटलेल्या फांद्या हटवून परिसर सुरक्षित केला.

सेक्टर २४, निगडी प्राधिकरण, फिनोलेक्स कंपनी परिसर, पिंपरी, आकुर्डीतील ओम साई हौसिंग सोसायटी तसेच काजळे पेट्रोल पंपाशेजारील पुणे-नाशिक महामार्ग परिसरात झाडे कोसळल्याच्या घटना घडल्या. अग्निशमन विभागाच्या पथकांनी त्वरित प्रतिसाद देत रस्त्यावर पडलेली झाडे हटवली, वाहतुकीतील अडथळे दूर केले आणि नागरिकांची



गैरसोय टाळली.

पावसाळ्यात सततचा पाऊस व जोरदार वाऱ्यामुळे झाडे उन्मळून पडणे किंवा मोठ्या फांद्या तुटण्याच्या घटना घडण्याची शक्यता असते. त्यामुळे नागरिकांनी अशा परिस्थितीत सतर्क राहून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन अग्निशमन विभागाने केले आहे.

अग्निशमन विभागाची सर्व पथके पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर २४ तास सज्ज असून, कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी तातडीने १०१ या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच झाड कोसळलेल्या ठिकाणी अनावश्यक गर्दी करू नये, तुटलेल्या फांद्या किंवा विद्युत तारा यांच्यापासून सुरक्षित अंतर राखावे आणि स्वतः झाडे किंवा फांद्या हटविण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहन महापालिकेच्या अग्निशमन विभागाने केले आहे.

# घराघरात पोहोचणार संविधान; पीसीएमसीच्या 'घर घर संविधान' उपक्रमाचा शुभारंभ

### ४ लाख विद्यार्थी आणि ८ लाख पालकांपर्यंत संविधानाची माहिती पोहोचविण्याचा संकल्प

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चिंचवड : प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'घर घर संविधान' या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ शनिवारी पीसीएमसी पब्लिक स्कूल, वाल्हेकरवाडी येथे झाला. या उपक्रमाच्या माध्यमातून सुमारे ४ लाख विद्यार्थी आणि ८ लाख पालकांपर्यंत भारतीय संविधानाची माहिती पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, संविधाननिष्ठ आणि जागरूक समाज घडविण्यास हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरेल, असे मत शिक्षण समितीच्या सभापती रविना सागर अंगोळकर यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाला विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसेवक



शेखर चिंचवडे, नगरसेविका पल्लवी वाल्हेकर, योगिता बारणे, उपायुक्त अण्णा बोदडे, शिक्षणाधिकारी संगीता बांगर, संविधान अभ्यासक तथा 'माणगाव पॅटर्न'चे प्रमुख नूर खा पठाण, सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी भाऊसाहेब भोईर म्हणाले की, संविधानातील लोकशाही, समता आणि बंधुता ही मूल्ये बालवयातच विद्यार्थ्यांच्या मनात रुजविणे आवश्यक आहे. त्यातून उद्याची पिढी अधिक सुसंस्कृत, जबाबदार आणि जागरूक नागरिक म्हणून घडेल. संविधानाबद्दल आदर आणि जाणीव निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

संविधान अभ्यासक नूर खा पठाण यांनी भारतीय संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नसून देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक प्रगतीचा मूलभूत दस्तऐवज असल्याचे सांगितले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना दररोज संविधानातील एका कलमाची माहिती आणि त्याचे सोपे विवेचन करण्यात येणार असून, त्यामुळे त्यांना संविधानाने दिलेले अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव होऊन सुजाण नागरिक घडण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले. उपायुक्त अण्णा बोदडे यांनीही विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे आभार शिक्षणाधिकारी संगीता बांगर यांनी मानले. यावेळी सेवानिवृत्त शहर अभियंता एम. टी. कांबळे, रवींद्र दुधेकर, शरद जाधव, वसंत साळवी, अनिल सूर्यवंशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेची कामे वेळेत पूर्ण करा; आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड प्रतिनिधी**

शहराची वाढती लोकसंख्या आणि पिण्याच्या पाण्याची वाढती गरज लक्षात घेता भामा आसखेड जलवाहिनी व पाणीपुरवठा प्रकल्पाची कामे निर्धारित मुदतीत पूर्ण करण्यासाठी गती द्यावी, असे निर्देश पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांना दिले.

भामा आसखेड पाणीपुरवठा प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत आयुक्तांनी कामांचा सविस्तर आढावा घेतला. रखडलेल्या कामांबद्दल नाराजी व्यक्त



करत उर्वरित कामे जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

बैठकीत सादर करण्यात आलेल्या माहितीनुसार, प्रकल्पातील जॅकवेलचे काम शंभर टक्के पूर्ण झाले असून पंप हाऊसचे ७५ टक्के, तर सबस्टेशनचे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. मात्र, उर्वरित तांत्रिक कामांची गती समाधानकारक नसल्याचे निरीक्षण आयुक्तांनी नोंदविले. शहरातील भविष्यातील पाणीपुरवठ्यासाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असल्याने जानेवारी २०२७ ही अंतिम मुदत कोणत्याही परिस्थितीत पाळली जावी. शक्य असल्यास त्यापूर्वीच प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ आणि यंत्रसामग्री वाढविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

कामात अनावश्यक दिरंगाई करणाऱ्या किंवा करारातील अटींचे पालन न करणाऱ्या संबंधित एजन्सी व ठेकेदारांवर नियमानुसार कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### पालिकेच्या शाळेत विद्यार्थ्यांकडून भाजप नगरसेविकेचे पाद्यपूजन : प्रकारावरून वाद, 'आप'कडून चौकशीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

पुणे महानगरपालिकेच्या एका शाळेत गुरु पौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांकडून भाजपच्या नगरसेविका स्वाती लोखंडे यांचे पाद्यपूजन करण्यात आल्याने वाद निर्माण झाला आहे. या घटनेचे फोटो आणि व्हिडिओ समाज माध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर विविध स्तरांतून टीका होत असून, आम आदमी पार्टीच्या (आप) पालक युनियनने या प्रकरणाची चौकशी करून कारवाईची मागणी केली आहे.

शाळेत आयोजित गुरु पौर्णिमा कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नगरसेविका स्वाती लोखंडे यांच्या पायांवर पाणी घालून पारंपरिक पद्धतीने पाद्यपूजन केले. या कार्यक्रमावेळी शिक्षक आणि शाळेचे अधिकारी उपस्थित होते. या घटनेमुळे शैक्षणिक मूल्यांचे उल्लंघन झाल्याची टीका केली जात आहे.

आम आदमी पार्टीच्या पालक युनियनचे मुकुंद किर्दत यांनी या घटनेवर तीव्र आक्षेप घेतला आहे. सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यासारख्या शहरात लोकप्रतिनिधींचे विद्यार्थ्यांकडून पाद्यपूजन करून घेणे हे अयोग्य, अशास्त्रीय आणि कर्मकांडाला प्रोत्साहन देणारे असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मुलांना अशा कृती करण्यास प्रवृत्त करणे चुकीचे असून, पालकही याला मूकसंमती देत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. किर्दत यांनी पुढे नमूद केले की, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य म्हणून नगरसेवकांनी पालिका शाळांचा दर्जा उंचावणे, विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढवणे आणि शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यावर भर दिला पाहिजे. भाजपचेच लोकप्रतिनिधी पालिका शाळांच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित करतात, मात्र अशा प्रतीकात्मक कार्यक्रमांना प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, या घटनेबाबत शिक्षण विभाग आणि भाजपकडून अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही. या प्रकरणाची चौकशी होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# राहुल गांधींवरील हक्कभंग नोटीस लोकशाहीची गळचेपी; काँग्रेसची टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात हक्कभंगाची नोटीस देण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. राहुल गांधी यांच्यावरील हक्कभंगाचा प्रस्ताव हा लोकशाहीविरोधी असून विरोधी पक्षाचा आवाज दडपण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी केला.

तिवारी म्हणाले की, नीट पेपरफुटी प्रकरणामुळे देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले असताना सरकारकडे ठोस उत्तरे नाहीत. विद्यार्थी आंदोलनानंतर व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्याऐवजी केवळ शिक्षेच्या तरतुदी कडक करण्यावर भर दिला जात असल्याचा दावा त्यांनी केला. विद्यार्थी आंदोलना-दरम्यान झालेल्या पोलिस कारवाईबाबतही त्यांनी केंद्र सरकारवर टीका केली. पंतप्रधान आणि केंद्रीय गृहमंत्री संसदेला सामोरे जाऊन या विषयावर उत्तर देण्याऐवजी घटनात्मक जबाबदारी टाळत असल्याचा आरोप त्यांनी केला.




राहुल गांधी यांनी संसदेत केलेले वक्तव्य हे विद्यार्थ्यांशी झालेल्या संवादाच्या संदर्भात होते. त्यात कोणत्याही विशिष्ट व्यक्तीचा उल्लेख नसल्याने ते संसदीय नियम 352(III) चे उल्लंघन ठरत नसल्याचा दावा तिवारी यांनी केला. सरकारने या वक्तव्याचा विपर्यास करून हक्कभंगाची नोटीस दिल्याचा आरोपही त्यांनी केला.

भाजपने काँग्रेसला संसदीय भाषेचे धडे देऊ नयेत, कारण भाजपच्या काही नेत्यांनी यापूर्वीही संसदेत विरोधी नेत्यांविषयी आक्षेपार्ह शब्दांचा वापर केला होता, असा आरोप करत त्यांनी भाजपवर दुटप्पीपणाचा आरोप केला.

काँग्रेस पक्ष तरुण, विद्यार्थी आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर संसदेत आवाज उठवत राहील. कोणत्याही नोटीस किंवा दबावामुळे ही भूमिका बदलणार नसल्याचेही तिवारी यांनी स्पष्ट केले.

## 'भेसळप्रकरणाशी संबंध सिद्ध झाल्यास सार्वजनिक जीवनातून निवृत्त होईन': दिलीप वळसे पाटील

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर । प्रतिनिधी

अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) दूध व्यवसायावर सुरू केलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर होत असलेल्या राजकीय आरोप-प्रत्यारोपांना आंबेगावचे आमदार तथा माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. दूध भेसळ किंवा कोणत्याही बेकायदेशीर प्रकरणात आपला दूरान्वयानेही संबंध आढळल्यास एका मिनिटाचाही विलंब न करता सार्वजनिक जीवनातून निवृत्त होईन, असे स्पष्ट आव्हान त्यांनी विरोधकांना दिले.

व्हिडिओ संदेशाद्वारे भूमिका मांडताना वळसे पाटील म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून राज्यासह आंबेगाव तालुक्यात एफडीएकडून दूध व्यवसायिकांवर तपासणी व कारवाई सुरू आहे. मात्र, या कारवाईशी कोणताही संबंध नसताना काही राजकीय विरोधक जाणीवपूर्वक आपले नाव जोडून प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करत आहेत.



भेसळ करणारी कोणतीही व्यक्ती, कंपनी किंवा संस्था असो, अशा कोणाच्याही पाठीशी आपण कधीही उभे राहणार नाही. एफडीए आणि पोलीस प्रशासन दोषींवर कठोर कारवाई करण्यास सक्षम असून कायद्यापुढे सर्व समान आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

खोटे आरोप करून राजकीय बदनामी करण्याचे षड्यंत्र सुरू असल्याचा आरोप करत त्यांनी विरोधकांना थेट इशारा दिला. बदनामीचे हे प्रकार तातडीने थांबवले नाहीत, तर संबंधितांविरोधात उच्च न्यायालयात फौजदारी कारवाईसह मोठ्या रकमेचा अब्रूनुकसानीचा दावा दाखल केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

आपण नेहमीच स्वच्छ, पारदर्शक आणि जनतेच्या विश्वासाला पात्र ठरेल असे राजकारण केले आहे. त्यामुळे नागरिक, प्रसारमाध्यमे आणि समाजमाध्यमांनी अफवांवर विश्वास न ठेवता वस्तुस्थितीची दखल घ्यावी, असे आवाहन करत शेवटी सत्याचाच विजय होईल, असा विश्वास दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केला.

## धामणीत शंभर टक्के अनुदानावर संकरीत मका व शुगरग्रेज बियाण्यांचे वाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी । प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील धामणी येथे पशुसंवर्धन विभागाच्या वतीने जिल्हा परिषद वैरण विकास योजना २०२६ अंतर्गत नोंदणीकृत पशुपालक शेतकऱ्यांना शंभर टक्के अनुदानावर संकरीत मका वैरण व शुगरग्रेज बियाण्यांचे वाटप करण्यात आले.

पक्षुधन विकास अधिकारी डॉ. संजय पांडे यांच्या हस्ते धामणी, पहाडधरा आणि शिरदाळे येथील लाभार्थी पशुपालक शेतकऱ्यांना बियाण्यांचे वितरण करण्यात आले. या योजनेमुळे पशुधनासाठी दर्जेदार हिरव्या चाऱ्याचे उत्पादन वाढण्यास चालना मिळणार असून पशुपालकांच्या चारा उपलब्धतेची समस्या कमी होण्यास मदत होणार आहे.



कार्यक्रमास टीव्हीएस कंपनीच्या समन्वयक संगीता वाळुंज यांच्यासह मोठ्या संख्येने लाभार्थी शेतकरी उपस्थित होते. .

## खडकवाडीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी । प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील खडकवाडी येथे लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली.

यावेळी ह.भ.प. नितीन महाराज सुक्रे यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी अण्णाभाऊंना अभिवादन करत त्यांच्या साहित्य, शाहिरी आणि सामाजिक कार्याचा गौरव केला.



कार्यक्रमप्रसंगी सरपंच अनिल डोके म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे कार्य संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी आहे. आपल्या प्रभावी शाहिरीतून त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रम सातासमुद्रापार पोहोचविला. त्यांच्या विचारांमधून सामाजिक समता, राष्ट्रप्रेम आणि परिवर्तनाचा संदेश मिळतो.

यावेळी उद्योजक दादाभाऊ वाळुंज, गणेश वाळुंज, योगेश पंचरास, मिनानाथ लोखंडे, सुरेश सुक्रे, श्रीराम वाळुंज, दिलीप डोके, पुनम सुक्रे, मयूर पंचरास, नामदेव सुक्रे तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## औंध जिल्हा रुग्णालयातील पदोन्नतीचा प्रस्ताव रखडला?; कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

औंध येथील जिल्हा रुग्णालयातील पात्र कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचा प्रस्ताव अद्याप वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आला नसल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली असून, त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण असल्याचे सांगितले जात आहे. पदोन्नतीची प्रक्रिया दीर्घकाळ प्रलंबित राहिल्याने सेवाहक्कांवर परिणाम होत असल्याची भावना काही कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, शासनाच्या नियमानुसार पात्र कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीची प्रक्रिया वेळेत पूर्ण होणे अपेक्षित असताना संबंधित प्रस्ताव अद्याप पुढील स्तरावर पाठविण्यात आलेला नाही. यामुळे अनेक कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची प्रतीक्षा करावी लागत असून, प्रक्रियेला विलंब होण्यामागील कारणांबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

याशिवाय, रुग्णालयातील काही कर्मचारी मंजूर पदांपेक्षा वेगळ्या स्वरूपाची कामे करत असल्याची चर्चा असून, मनुष्यबळाचे योग्य नियोजन न




झाल्यास प्रशासकीय कामकाज आणि रुग्णसेवेवर त्याचा परिणाम होऊ शकतो, अशी चिंता कर्मचाऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. या दाव्यांची अधिकृत पुष्टी मात्र झालेली नाही.

दरम्यान, काही महिन्यांपूर्वी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रशासनात शिस्त आणण्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न सुरू झाल्याचे कर्मचारी मान्य करतात. मात्र, पदोन्नतीचा प्रस्ताव अद्याप मार्गी न लागल्याने कर्मचाऱ्यांमधील नाराजी कायम असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

पात्र कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून शासनमान्य पदांनुसार मनुष्यबळाचे नियोजन करावे, अशी मागणी संबंधित कर्मचाऱ्यांकडून होत आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणाची वस्तुस्थिती तपासून आवश्यक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, या संदर्भात जिल्हा रुग्णालय प्रशासनाची अधिकृत भूमिका उपलब्ध होऊ शकली नाही. प्रशासनाची बाजू प्राप्त झाल्यास तीही प्रसिद्ध करण्यात येईल.

## लोकमान्य टिळक, अण्णाभाऊ साठे व माजी महापौर मधुकरराव पवळे यांना महापालिकेकडून अभिवादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे, । प्रतिनिधी

पिंपरी, दि. १ ऑगस्ट : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि महानगरपालिकेचे दिवंगत माजी महापौर मधुकरराव पवळे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमा व पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत आयोजित कार्यक्रमात



उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते लोकमान्य टिळक, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे आणि माजी महापौर मधुकरराव पवळे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच निगडी येथील भक्ती-शक्ती चौकातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यासही पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसदस्य निलेश तरस, अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, मधुरा शिंदे, ऐश्वर्या तरस, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, माजी नगरसदस्य सचिन चिखले, माजी नगरसदस्या सुमन पवळे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, विविध पदाधिकारी, दिवंगत मधुकरराव पवळे यांचे नातेवाईक तसेच नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रनिर्माणातील योगदानाचे, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक समता, परिवर्तन आणि साहित्य क्षेत्रातील कार्याचे तसेच माजी महापौर मधुकरराव पवळे यांनी पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासासाठी दिलेल्या योगदानाचे स्मरण केले. त्यांच्या विचारांचा व कार्याचा आदर्श घेऊन समाजहित आणि शहर विकासासाठी कार्य करण्याचा संकल्पही यावेळी व्यक्त करण्यात आला.

## अण्णाभाऊ साठे म्हणजे साहित्याची खाण'; पारगावात १०६ वी जयंती उत्साहात साजरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पारगाव प्रतिनिधी

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त युगप्रवर्तक प्रतिष्ठान, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती आणि अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची निवासी शाळा, पेठ यांच्या संयुक्त विद्यमाने जयंती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युगप्रवर्तक प्रतिष्ठानचे अध्यक्ष गौतमराव खरात होते. अण्णाभाऊ साठे म्हणजे साहित्याची खाण असून, त्यांच्या साहित्याने कष्टकरी



व वंचित समाजाच्या संघर्षाला आवाज दिला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या साहित्याचा अभ्यास करून प्रेरणा घ्यावी, असे ते म्हणाले.

यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. दहावीचा २०२५-२६ चा १०० टक्के निकाल लागल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच वृक्षारोपणाचा उपक्रमही राबविण्यात आला. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी आणि प्रतिष्ठानचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सारांश वृत्त

### सिडकोच्या दुटप्पी धोरणाविरोधात नागरिकांचे शांततापूर्ण आंदोलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

खारघर येथील आरबीआय मेट्रो स्टेशन जवळील फणसवाडीचे प्रवेशद्वार ते फणसवाडी या मार्गावर सिडको प्रशासनाकडून दरवर्षी पावसाळ्यात लादल्या जाणाऱ्या ३ महिन्यांच्या (१५ जून ते १५ सप्टेंबर) प्रवेशबंदीच्या दुटप्पी व पक्षपाती धोरणाविरोधात स्थानिक नागरिकांचा रोष उफाळून आला आहे. सिडकोच्या या अन्यायाविरोधात 'खारघर हिल वेल्फेअर असोसिएशन (रजि.)' व 'सजग नागरिक मंच, नवी मुंबई' यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक ०२ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ०६:०० ते ०७:०० दरम्यान फणसवाडी रस्त्याच्या मुख्य प्रवेशद्वारावर शांततापूर्ण निषेध आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

काय आहे मुख्य वाद?

खारघर व बेलापूर परिसरातील शेकडो नागरिक गेल्या अनेक वर्षांपासून या निसर्गरम्य रस्त्यावर नियमितपणे 'मॉर्निंग वॉक'साठी जातात. मात्र, सिडको प्रशासन दरवर्षी पावसाळ्यात सुरक्षेचे आणि अपघातांचे कारण देत स्थानिक नागरिकांना गेटवर रोखते. यावर्षी सिडकोचा दुटप्पी कारभार उघडकीस आला आहे. एका बाजूला आरोग्य जपणे आणि निसर्गाच्या सानिध्यात चालणे या उद्देशाने जाणाऱ्या सर्वसामान्य स्थानिक नागरिकांना ''धोका'' दाखवून प्रवेश नाकारला जात आहे; तर दुसऱ्या बाजूला, २३ ऑगस्ट २०२६ रोजी होणाऱ्या सिडकोच्या मॅरेथॉन स्पर्धेत भाग घेणाऱ्या धावपटूंना शनिवार आणि रविवारी याच रस्त्यावर सरावासाठी सर्रास प्रवेश दिला जात आहे. नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नानुसार, या रस्त्यावरून फणसवाडीतील ग्रामस्थांची ये-जा, शालेय बसेस आणि इतर वाहतूक नियमितपणे सुरू असते. मग केवळ दैनंदिन वॉक करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांच्या बाबतीतच अपघाताची भीती आणि सुरक्षेचा प्रश्न कसा निर्माण होतो? भारतीय संविधानाने दिलेल्या ''कायद्यापुढे समानता आणि समान न्याय'' या मूलभूत हक्काची ही उघड पायमल्ली आहे.

# शहरी आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनची व्यापक पावले; नागरिकांना घराजवळ दर्जेदार आरोग्य सुविधा देण्यास प्राधान्य : सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : वृत्तसंस्था**

राज्यातील शहरी भागातील नागरिकांना त्यांच्या घराजवळ सहज, दर्जेदार आणि सर्वसमावेशक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने शहरी आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. आयुक्तालयाच्या माध्यमातून आरोग्य सेवा अधिक सक्षम, परिणामकारक आणि लोकाभिमुख करण्यासाठी विविध महत्त्वपूर्ण निर्णय आणि धोरणात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

'शहरी आयुक्तालयाच्या प्रशासकीय संरचना' आणि 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' योजनेच्या आढावा बैठकीत राष्ट्रीय आरोग्य अभियान नागरी आयुक्त डॉ. सुनील भोकरे, अतिरिक्त अभियान संचालक जगन्नाथ वीरकर, सहसंचालक दीप्ती देशमुख-पाटील तसेच विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री आबिटकर म्हणाले की, वेगाने वाढणाऱ्या शहरी लोकसंख्येच्या आरोग्य गरजा लक्षात घेऊन राज्य शासनाने शहरी आरोग्य व्यवस्थेचा व्यापक आराखडा तयार केला आहे. प्रत्येक नागरिकाला गुणवत्तापूर्ण प्राथमिक आरोग्य सेवा वेळेत मिळावी, यासाठी पायाभूत सुविधा, मनुष्यबळ आणि प्रशासकीय व्यवस्था अधिक सक्षम करण्यात येत आहे. शहरस्तरावरील आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन उणिवा दूर कराव्यात आणि प्रत्येक स्तरावर समाधानाभिमुख कार्यपद्धती स्वीकारावी. राज्यात सध्या २९ महानगरपालिका आणि ३९९ नगरपरिषदा, नगरपंचायती व कटकमंडळे अशा एकूण ४२८ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरोग्य सेवा विस्ताराचे काम सुरू आहे. या क्षेत्रांमध्ये २,९३२ नागरी आयुष्मान आरोग्य मंदिरे व 'आपला दवाखाना', ८१८ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ४४ नागरी सामुदायिक आरोग्य केंद्रे तसेच इतर १०५ आरोग्य संस्था कार्यरत आहेत. ऑक्टोबर २०२५ ते जून २०२६ या कालावधीत नागरी आरोग्य संस्थांच्या कार्यान्वयनात लक्षणीय वाढ झाली आहे. नागरी आयुष्मान आरोग्य मंदिरांची संख्या १,०४१ वरून २,००६ पर्यंत वाढली असून 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' केंद्रांची संख्या ४३२ वरून ६७४ पर्यंत पोहोचली आहे. एकूण कार्यान्वित नागरी आरोग्य संस्थांची संख्या २,५३८ वरून ३,७६७ इतकी झाली आहे. मंत्री आबिटकर यांनी नागरी आरोग्य संस्थांमधील मनुष्यबळाचे नियमित मूल्यमापन करण्याचे निर्देश दिले. कार्यक्षम आणि सक्षम व्यक्तींची नियुक्ती करून नागरिकांना दर्जेदार सेवा मिळेल, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यास त्यांनी सांगितले. तसेच, प्रत्येक आरोग्य संस्थेच्या कार्यक्षमतेचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करून सेवा वितरणात कोणतीही उणीव राहणार नाही, यासाठी सातत्यपूर्ण देखरेख ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' या योजनेचा आढावा घेत मंत्री आबिटकर यांनी योजनेची प्रभावी अंमलबजावणी, सेवा गुणवत्तेतील सातत्यपूर्ण सुधारणा आणि नागरिकांचा वाढता विश्वास कायम राखण्यावर विशेष भर दिला. कार्यकुशल व प्रशिक्षित मनुष्यबळाच्या माध्यमातून अधिक सक्षम, विश्वासार्ह आणि लोकाभिमुख आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना सातत्याने राबविण्याचे निर्देश त्यांनी दिले. शहरी आरोग्य सेवा अधिक परिणामकारक करण्यासाठी राष्ट्रीय गुणवत्ता मानकांनुसार पायाभूत सुविधा विकसित करणे, रिक्त पदे कालबद्ध पद्धतीने भरणे, समुदाय सहभाग वाढविणे, जनआरोग्य समित्या आणि महिला आरोग्य समित्यांना सक्रिय करणे, आरोग्यदूत संकल्पना राबविणे तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत आरोग्य सेवांचे प्रभावी नियोजन करण्यावर भर दिला जाणार असल्याचेही मंत्री आबिटकर यांनी स्पष्ट केले.

## नीरज चोप्राला सुवर्णाचा धक्का! श्रीलंकेच्या थरंगाने पटकावले सुवर्ण; भारताला रौप्य आणि कांस्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**



ग्लासगो । वृत्तसंस्था

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मधील पुरुषांच्या भालाफेक स्पर्धेत भारताचा ऑलिम्पिक आणि जागतिक विजेता नीरज चोप्रा याला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. नीरजने दुसऱ्या प्रयत्नात हंगामातील सर्वोत्तम ८५.८३ मीटर भालाफेक करत उत्कृष्ट कामगिरी केली. मात्र, श्रीलंकेच्या रुमेश थरंगा पाथिरागे याने दुसऱ्याच प्रयत्नात ८९.७५ मीटरची भालाफेक करत सुवर्णपदकावर नाव कोरले.

भारताच्या यश वीर यानेही दमदार कामगिरी करत कांस्यपदक जिंकले. त्यामुळे भारताने या स्पर्धेत भालाफेकीत रौप्य आणि कांस्य अशी दोन पदके आपल्या नावावर केली.

स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे सुमारे १४ अंश सेल्सियस थंड वातावरणात ही स्पर्धा पार पडली. प्रतिकूल हवामानाशी श्रीलंकेच्या थरंगाने सर्वाधिक प्रभावीपणे जुळवून घेत सुवर्णपदक पटकावले, तर नीरजची हंगामातील सर्वोत्तम कामगिरीही सुवर्णासाठी अपुरी ठरली. नीरजची स्पर्धा पाहण्यासाठी स्थानिक नागरिकांसह भारतीय चाहत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

## ईपीएफओच्या १,८१६ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीत घोटाळा; अनिल अंबानींसह रिलायन्स कॅपिटलविरोधात सीबीआयचा गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या (ईपीएफओ) १,८१६.२२ कोटी रुपयांच्या गुंतवणूक घोटाळ्याप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने रिलायन्स कॅपिटल लिमिटेड, कंपनीचे माजी अध्यक्ष अनिल धीरूभाई अंबानी, काही अज्ञात शासकीय अधिकारी आणि अन्य संबंधितांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.





केंद्रीय अन्वेषण विभागाने दिलेल्या माहितीनुसार, हा गुन्हा कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने कामगार व रोजगार मंत्रालयामार्फत दिलेल्या तक्रारीच्या आधारे नोंदविण्यात आला आहे. तक्रारीत कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या हजारो कोटी रुपयांच्या गुंतवणुकीत कथित अनियमितता आणि आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात रिलायन्स कॅपिटलकडून कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या निधीचा वापर, गुंतवणूक प्रक्रिया आणि त्यामधील कथित नियमभंगाची केंद्रीय अन्वेषण विभागाकडून चौकशी केली जाणार आहे. तसेच या व्यवहारात शासकीय अधिकाऱ्यांची भूमिका होती का, याचाही तपास केला जाणार आहे.

या प्रकरणामुळे कर्मचारी भविष्य निर्वाह निधीसारख्या लाखो कर्मचाऱ्यांच्या बचतीशी संबंधित निधीच्या सुरक्षिततेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, चौकशीतून नेमके काय निष्पन्न होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# विठुरायाच्या वारकऱ्यांसाठी १०८ रुग्णवाहिकेची अहोरात्र आरोग्यसेवा

### २७ रुग्णवाहिकांद्वारे २,४४५ वारकऱ्यांना वेळेत वैद्यकीय मदत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर, दि. १ ऑगस्ट : आषाढी वारीदरम्यान पंढरपूरकडे जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांना कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा (डायल १०८) अंतर्गत २७ रुग्णवाहिका २४ तास सेवेत तैनात करण्यात आल्या होत्या. या सेवेमार्फत एकूण २,४४५ वारकऱ्यांना वेळेत आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात आली. राज्यातील १०८ आपत्कालीन वैद्यकीय सेवा बीव्हीजीकडून संचालित केली जाते.

वारीदरम्यान वारकऱ्यांना तातडीची आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, यासाठी पंढरपूर येथे विशेष नियंत्रण कक्ष उभारण्यात आला होता. या नियंत्रण कक्षातून पालखी सोहळ्याचे सातत्याने निरीक्षण करून आवश्यकतेनुसार रुग्णवाहिका घटनास्थळी पाठविण्याचे नियोजन करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या नियंत्रण कक्षाला भेट देऊन सेवा व्यवस्थेची पाहणी केली.

बीव्हीजीचे चेअरमन हणमंतराव गायकवाड यांनी सांगितले की, पंढरीच्या वारीत भाविकांची सेवा करण्याची संधी मिळणे हे भाग्याची बाब आहे. आरोग्यमंत्री डॉ. प्रकाश आबिटकर यांच्या सूचनेनुसार अल्पावधीत २७ रुग्णवाहिकांचे नियोजन करण्यात आले. वारकऱ्यांना सुरक्षित आणि आरोग्यदायी वारीचा अनुभव मिळावा, यासाठी बीव्हीजीचे आरोग्यदूत अहोरात्र कार्यरत होते.

वारीतील मानाच्या दहा पालख्यांसोबत १०८ रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून देण्यात आली होती. यामध्ये संत निवृत्तीनाथ महाराज (त्र्यंबकेश्वर), संत ज्ञानेश्वर महाराज (आळंदी), संत सोपानकाका महाराज (सासवड), संत मुक्ताबाई (मुक्ताईनगर), संत तुकाराम महाराज (देहू), संत नामदेव महाराज (पंढरपूर), संत एकनाथ महाराज (पैठण), रुक्मिणी माता (कौंडणपूर, अमरावती), संत निळोबाराय (पिंपळनेर, पारनेर) आणि संत चांगाटेश्वर महाराज (सासवड) यांच्या पालख्यांचा समावेश होता.

याशिवाय, आषाढी वारीदरम्यान 'गुड समरीटन' स्वयंसेवकांनी मोबाईल ॲपच्या माध्यमातून आपत्कालीन घटनांची माहिती तातडीने १०८ नियंत्रण कक्षापर्यंत पोहोचवली. त्यामुळे रुग्णवाहिका अल्पावधीत घटनास्थळी दाखल होऊन अनेक वारकऱ्यांना वेळेत उपचार मिळू शकले.

स्वयंसेवक दयानंद मेंशेके यांनी सांगितले की, शासनाच्या प्रशिक्षणामुळे आपत्कालीन परिस्थितीत मदत करण्याचा आत्मविश्वास मिळाला. वारीदरम्यान एक महिला भाविक बेशुद्ध पडताच 'गुड समरीटन' ॲपद्वारे माहिती देण्यात आली. त्यानंतर १०८ रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी पोहोचून संबंधित महिलेला वेळेत वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यात आले.

## विश्वगुरु मीम्सला का घाबरतात? अभिजीत दिपकेंचे पंतप्रधान मोदींवर टीकास्त्र, गुन्हे दाखल करण्यावरून नाराजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा आंदोलनाच्या माध्यमातून मिळवण्यात यशस्वी झाल्यानंतर चर्चेत आहेत. तरुणांना जागृत करून त्यांना आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करण्यासाठी रस्त्यावर आणणाऱ्या दिपकेंची सध्या जोरदार चर्चा आहे. या आंदोलनानंतर त्यांनी पंतप्रधान मोदींवर टीका सुरू केली आहे. पंतप्रधान मोदींच्या इन्स्टाग्राम व्हिडीओवर त्यांनी टीका केली होती. आता त्यांनी आंदोलकांवर दाखल होत असलेल्या गुन्ह्यांवरून पंतप्रधान मोदींना लक्ष्य केले आहे.

अभिजीत दिपके ४० दिवसानंतर छत्रपती संभाजीनगरमधील आपल्या घरी परतले आहेत. न्यूज तकला आज त्यांनी विस्तृत मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये त्यांना या आंदोलनातून काय शिकायला मिळाले? असा प्रश्न विचारण्यात आला. आंदोलनात विविध विचारसरणीचे लोक शिरले होते, त्यांनी शिवीगाळ केली, असेही दिपकेंना विचारण्यात आले होते. त्यावर ते म्हणाले की, मी शिवीगाळाचे अजिबात समर्थन करत नाही. कुणालाच शिवीगाळ करायला नको. पण सरकारच्या वतीने उपरोधिक मीम बनविणाऱ्यांनाही लक्ष्य केले जात आहे. ते (पंतप्रधान मोदी) या भूतलावरील सर्वात शक्तीशाली व्यक्ती असल्याचा दावा करतात. ते विश्वगुरु आहेत. विश्वगुरूंना मुलांच्या विनोदाला घाबरण्याची गरज काय? त्यांनी जोक, मीम्सला घाबरण्याची गरज नाही. जेन-झींची स्वतःची अभिव्यक्तीची शैली आहे. ते आपले म्हणणे मांडण्यासाठी विनोदबुद्धीचा वापर करतात. त्यावरून उपरोधिक शैलीतील मीम्स बनवितात, असेही अभिजीत दिपके म्हणाले. अभिजीत दिपके पुढे म्हणाले, पोलीस लाठ्या चालवतात त्यावर प्रत्युत्तर म्हणून ही मुले मीम्स बनवितात. मला नाही वाटत लोकशाहीत यापेक्षा आणखी काही चांगली गोष्ट असू शकते. जिथे क्रूरतेला विनोदाने प्रत्युत्तर दिले जात आहे. अभिजीत दिपके आता नेता झाला आहे का? असाही प्रश्न या मुलाखतीमध्ये विचारण्यात आला. यावर अभिजीत यांनी आपण नेता नसल्याचे स्पष्ट केले. त्यांनी म्हटले, लोक एखाद्याला नेता किंवा हिरो बनवून टाकतात. लोक एखाद्याला हिरो बनवून टाकतात आणि त्याच्याकडून परिवर्तन घडेल, अशी अपेक्षा करतात. क्रिकेटपटू, सेलिब्रिटी आणि राजकारणी यांच्याबाबत अनेकदा ही चूक होती. त्यामुळे मला हिरो बनवू नका, असे मी आवाहन करतो. अभिजीत दिपकेंचे आंदोलन यशस्वी झाल्यानंतर अनेक नेते येऊन त्यांच्या भेटीगाठी घेत आहेत. त्यामुळे अभिजीत दिपके आगामी काळात राजकारणात प्रवेश करणार का? अशी अटकळ बांधली जात आहे. याबद्दल प्रश्न विचारला असता आपण कधीच राजकारणात प्रवेश करणार नाही, असे अभिजीत दिपके यांनी स्पष्ट केले.

## भारतीय हॉकीच्या जर्सीला भगवा रंग; कपिल सिब्बल यांचा संतप्त सवाल – 'जर्सी बदलली की विचारही बदलणार का?'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

आगामी आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाच्या विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय पुरुष आणि महिला हॉकी संघाच्या पारंपरिक निळ्या जर्सीऐवजी भगव्या रंगाची जर्सी वापरण्याच्या निर्णयावर राज्यसभा सदस्य कपिल सिब्बल यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ही आणखी एक खालची पातळी आहे. असा प्रकार यापूर्वी कधीच पाहिला नव्हता, अशा शब्दांत त्यांनी या निर्णयावर टीका केली.

समाजमाध्यमावरील आपल्या संदेशात सिब्बल यांनी उपरोधिक टिप्पणी करत, तर्क असा आहे का की जर्सी भगवी असेल, तर विचारही भगवे होतील? असा प्रश्न उपस्थित केला.

पुढील महिन्यात नेदरलँड्स आणि बेल्जियम येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाच्या विश्वचषक स्पर्धेत भारतीय पुरुष आणि महिला संघ प्रथमच पारंपरिक निळ्या जर्सीऐवजी भगव्या रंगाच्या जर्सीत खेळताना दिसणार आहेत.

या निर्णयावर अनेक माजी हॉकीपटूंनी प्रश्न उपस्थित केले आहेत. मात्र, भारतीय हॉकी महासंघाने हा बदल केवळ तांत्रिक कारणांमुळे करण्यात आल्याचे स्पष्टीकरण दिले आहे.

जर्सीच्या रंगबदलाच्या निर्णयामुळे क्रीडा क्षेत्रातील परंपरा, राष्ट्रीय ओळख आणि राजकीय प्रतीकांच्या वापराबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

# 'देश मान्य करणार नाही, तर हद्दपारी नाही!' सर्वोच्च न्यायालयात केंद्राची कबुली; आसाममधील परदेशी घोषित व्यक्तींच्या अनिश्चित नजरकैदेवर गंभीर प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

आसाममध्ये परदेशी नागरिक म्हणून घोषित करण्यात आलेल्या आणि दीर्घकाळ नजरकैदेत ठेवण्यात आलेल्या व्यक्तींच्या प्रकरणात केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात महत्त्वाची भूमिका मांडली आहे. गृह मंत्रालयाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात स्पष्ट केले की, एखाद्या व्यक्तीची नागरिकत्वाची ओळख संबंधित देशाने अधिकृतपणे मान्य केली नाही आणि त्या देशाने त्या व्यक्तीला स्वीकारण्यास संमती दिली नाही, तर अशा व्यक्तीची हद्दपारी करणे शक्य नाही.

हे प्रतिज्ञापत्र अशा याचिकेवर दाखल करण्यात आले आहे, ज्यामध्ये आसाममध्ये परदेशी घोषित करण्यात आलेल्या व्यक्तींना हद्दपारीची कोणतीही शक्यता नसतानाही वर्षानुवर्षे नजरकैदेत ठेवले जात असल्याला आव्हान देण्यात आले आहे. याचिकाकर्त्यांचा दावा आहे की, कोणतीही निश्चित कालमर्यादा नसताना अशा व्यक्तींना बंदिस्त ठेवणे हे त्यांच्या मूलभूत अधिकारांवर गदा आणणारे आहे.



केंद्र सरकारने न्यायालयाला सांगितले की, कोणत्याही परदेशी नागरिकाला त्याच्या मूळ देशात पाठविण्यासाठी संबंधित देशाकडून त्या व्यक्तीचे नागरिकत्व अधिकृतपणे मान्य होणे आवश्यक असते. त्यानंतरच त्या देशाने संबंधित व्यक्तीला स्वीकारण्यास संमती द्यावी लागते. या दोन्ही प्रक्रिया पूर्ण झाल्याशिवाय भारत सरकारला हद्दपारीची कारवाई करता येत नाही. त्यामुळे अनेक प्रकरणांमध्ये नागरिकत्वाची पडताळणी आणि संबंधित देशाची संमती न मिळाल्याने हद्दपारीची प्रक्रिया वर्षानुवर्षे रखडते.

या प्रकरणामुळे आसाममधील नजरकैद केंद्रांमध्ये ठेवलेल्या परदेशी घोषित व्यक्तींचे भविष्य पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. एका बाजूला राष्ट्रीय सुरक्षा, सीमाव्यवस्थापन आणि बेकायदा स्थलांतर रोखण्याचा मुद्दा आहे, तर दुसऱ्या बाजूला कोणत्याही निश्चित कालमर्यादेशिवाय व्यक्तींना नजरकैदेत ठेवण्याच्या कायदेशीर आणि मानवी हक्कांच्या प्रश्नांवर न्यायालयाला निर्णय घ्यावा लागणार आहे.

सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या या सुनावणीत केंद्राच्या प्रतिज्ञापत्रामुळे हद्दपारी प्रक्रियेतील आंतरराष्ट्रीय कायदेशीर अडचणी स्पष्ट झाल्या आहेत. संबंधित देशाने नागरिकत्व मान्य केल्याशिवाय आणि त्या व्यक्तीला स्वीकारण्यास तयार असल्याची अधिकृत पुष्टी दिल्याशिवाय भारताला हद्दपारी करता येत नसल्याची भूमिका केंद्राने स्पष्टपणे मांडली आहे.

या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय केवळ आसामपुरता मर्यादित राहणार नसून, देशभरातील परदेशी घोषित व्यक्ती, नजरकैद केंद्रांचे धोरण आणि भारताच्या हद्दपारी प्रक्रियेवरही दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो.